Vol 1 Issue 12 Sept 2012

ISSN No : 2249-894X

# Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
Vol.1,Issue.12 ,Sept; 12pp.1-4
ISSN:-2249-894X

Available online at www.reviewofresearch.net

RESEARCH PAPER

# पश्चिम तटावरील सुरक्षितता – काल आणि आज

*अनिल माणिकराव बैसाणे*

*झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे*

*सारांश :*

प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील ऐतद्देशीय सत्ताधीशांना पश्चिम किनारपट्टीच्या सुरक्षिततेची आवश्यकता भासली नव्हती. कारण समुद्र पर्यटन हे आपल्या व्यवस्थेमध्ये निषिद्ध मानले जात होते. धार्मिकतेचा जबरदस्त प्रभाव असलेल्या भारतीय राज्यकर्त्यांना सागरावरील प्रभुत्वाची आणि त्यायोगे आरमार उभारणीची कोणतीही निकड भासली नाही. पश्चिम तटाच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला तो शिवकाळात ! त्या आधीच्या काळात सागरी मार्गाने शत्रुंच्या कारवायांचा फारसा गांभीर्याने विचारही नव्हता. कारण सागरी मार्गाचा शोधही लागलेला नव्हता.

## प्रस्तावना :

मात्र वास्को–द–गामाच्या शोधामुळे परकीय सागरी मार्गाने भारताकडे येवू लागल्याने पश्चिम किनाऱ्यावर त्यांनी आपल्या वसाहती स्थापन केल्यात. सुरूवातीला युरोपियनांचा हेतु राजकारण करणे हा नसून फक्त व्यापारीच होता. मात्र पुढे–पुढे त्यांच्यामध्ये साम्राज्यतृष्णा बळावल्याने राजकीय हेतू निश्चित होवू लागला. शिवाजी महाराजांना पश्चिम तटाच्या सुरक्षिततेची गरज निर्माण झाली ती जावळीवर अधिकार केल्यावरच ! महाराजांनी चंद्रराव मोरेंचा पाडाव करून जावळीचा प्रदेश जिंकल्यामुळे स्वराज्याची सीमा समुद्रापर्यंत येवून भिडल्यात. स्वराज्याच्या रक्षणाकरिता पश्चिम किनाऱ्यावर सागरी दुर्गांचे बांधकाम करून महाराजांनी प्रबळ आरमार उभारले. कारण महाराजांना मुघल व विजापूरी शासकांप्रमाणेच सागरावर वर्चस्व असलेल्या इंग्रज, पोर्तुगीज व फ्रेंचांचासुद्धा विरोध होता. याकरिता महाराजांनी उंदेरी–खंदेरी, कुलाबा, पद्मदुर्ग, सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, पूर्णगड, विजयदुर्ग, देवगड, सिंधुदुर्ग सारखे सागरी किल्ले बांधून परकीयांना शह दिला. यामुळे महाराजांचे जमिनीवरील सामर्थ्यांप्रमाणेच सागरावरही वर्चस्व प्रस्थापित झाले.

## पश्चिम तटावरील सुरक्षितता – काल :

प्राचीन काळात भारत वर्षाचे रोम, व्हेनिस आणि जिनेव्हा या नगराशी व्यापार चालत असे. याकाळात व्यापारी तुर्कस्थान व इराण या मार्गाने व्यापार करीत. मात्र सन 1453 मध्ये तुर्कांनी कॉन्स्टॅटिनोपल ही रोमन साम्राज्याची राजधानी जिंकून घेतल्याने जमिनीच्या मार्गाने (खुष्कीच्या) चालणारा व्यापार बंद पडला. कारण कॉन्स्टॅटिनोपल हे प्रमुख व्यापारी केंद्र होते. भारतीय मालाला मोठे महत्त्व असल्यामुळे युरोपियन राष्ट्रांनी सागरी मार्गांच्या शोधास प्रारंभ केला. यातूनच बार्थोलो डायस, कोलंबस, वास्को–द–गामा यासारखे धाडसी खलाशी निघालेत. सन 1498 मध्ये पोर्तुगालचा वास्को–द–गामा दक्षिण अफ्रिकेच्या टोकाला वळसा घालून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत बंदरावर उतरला. ही घटना जगाच्या इतिहासाला नवी कलाटणी देणारी ठरली. कारण भारताशी सागरी मार्गाने युरोपियनांचा व्यापारी संबंध प्रस्थापित होणार होता.

याबरोबरच पोर्तुगीज, डच, इंग्रज, फ्रेंच असे युरोपियन येवून त्यांनी दीव, दमण, साष्टी, वसई, चौल, मुंबई, सुरत, भडोच, खंबायत, अहमदाबाद, मद्रास, पॉडेचरी इत्यादी ठिकाणी किनारपट्टीवर आपल्या वसाहती स्थापन केल्यात.[1]

**Please cite this Article as :** *अनिल माणिकराव बैसाणे* **,** *पश्चिम तटावरील सुरक्षितता – काल आणि आज* **: Review Of Research (Sept; 2012)**

प्रारंभी ह्या युरोपियनांनी आपले व्यापारी हितसंबंध सुरक्षित राखण्याकरिता ऐतद्देशीय राज्यकर्त्यांशी स्नेहसंबंध ठेवलेत. मात्र नंतर या युरोपियनांमध्ये कमालीचा स्वार्थ बळावला. तसेच येथे सत्ता स्थापन करण्याचीही महत्त्वाकांक्षा बळावू लागल्याने आपसांत संघर्ष निर्माण होण्याबरोबरच ऐतद्देशीयांशीही संघर्ष उद्भवू लागलेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोकण स्वारीच्या वेळी आणि सुरतेच्या स्वारी प्रसंगी इंग्रजांशी तणाव निर्माण झाला होता. जंजिऱ्याच्या सिद्दीचा तर महाराजांना सुरूवातीपासूनच विरोध राहीला होता. पश्चिम किनाऱ्यावर वर्चस्व प्रस्थापित करून स्वराज्य सुरक्षित राखण्यासाठी शिवाजी महाराजांना इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी यांच्याशी संघर्ष करावा लागला.[2] याकरिताच महाराजांना सागरी दुर्गाची आणि आरमाराची आवश्यकता होती. म्हणूनच महाराजांनी नव्याने सागरी दुर्ग बांधलेत तर जिंकून घेतलेल्यांची डागडूजी करून सन 1661 मध्ये सामर्थ्यशाली आरमार उभारले.

सन 1653 मध्ये महाराजांनी आदिलशहाकडून विजयदुर्ग आणि सन 1660 मध्ये सुवर्णदुर्ग जिंकून घेतलेत. आवश्यक बांधकामे करून ही सागरीदुर्ग नव्याने आरमारात सज्ज केलेत.[3] सन 1662 मध्ये यशवंतगड नव्यानेच बांधुन काढला. महत्त्वाचे म्हणजे शाहिस्तेखानाचा बंदोबस्त केल्यावर कोकण स्वारीत आदिलशाही मुलूख जिंकून घेतला. याचवेळी शिवाजी महाराजांनी अलिबाग ताब्यात घेवून सन 1663 मध्ये कुलाबा या सागरीदुर्गाचे बांधकाम सुरू केले. एवढेच नव्हे तर कुलाबा हे मराठा आरमाराचे प्रमुख केंद्र बनवून दर्यासारंग व मायनाक भंडारी यांचे अधिपत्याखाली हे ठाणे विकसित केले.[4]

सन 1664 ते 1667 याकाळात मालवणच्या किनाऱ्यावर कुरटे बेटवर गोविंद प्रभू व हिरोजी इंदूलकर या स्थापत्य विशारदांच्या नेतृत्वात सिंधुदुर्गाचे बांधकाम करवून घेतले. स्वराज्यातील आरमाराचा मानबिंदू ठरलेल्या सिंधुदुर्गा समोरच पद्मदुर्ग, राजकोट व सर्जेकोट या साागरी दुर्गांचे बांधकाम करवून सिंधुदुर्ग अधिकाधिक सुरक्षित केला.[5]

तसेच मुंबई हे संपन्न बंदर इंग्रजांच्या वर्चस्वात होते. त्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवता यावे म्हणून महाराजांनी सन 1679 मध्ये खांदेरी बेटावर बांधकाम सुरू केले. स्वराज्याच्या आरमारात खांदेरी आणि उंदेरी या भर समुद्रात असलेल्या दुर्गांची भर पडल्यामुळे कुलाबास संगत होवून मुंबईकरांना इंग्रजांच्या सागरी हालचालींवर नियंत्रण ठेवता आले.[6]



छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमाराचे महत्त्व ओळखून खांदेरी–उंदेरीपासून ते मालवणपर्यंत सागरी दुर्ग बांधून आरमार उभारले. महाराजांचे हे आरमार कान्होजी आंग्रेंच्या नेतृत्वात अधिकाधिक संपन्न आणि सामर्थ्यशाली बनले होते. आंग्रे सागरावर कोणाचेही निशाण जुमानत नसत. आंग्रे घराण्याच्या धाडशी पराक्रमाने मराठा आरमाराने पं. किनाऱ्यावर मोठा दरारा निर्माण केला होता. राजाराम महाराजांच्या काळात जमिनीवर मराठा सत्तेची पीछेहाट झाली असली तरी सागरावर कान्होजी आंग्रेंनी इंग्रज, पोर्तुगीज, सिद्दी यांचा पराभव करून आपले वर्चस्व निर्माण केले होते. संचाराकरिता कान्होजींची परवानगी घ्यावी लागत असे.[7]

100 एकर जागेवर वसलेला देवगडसारखा अभेद्य सागरीदुर्ग कान्होजींने बांधून स्वराज्यरक्षणाची महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. हाच दबदबा आणि दरारा कान्होजीनंतर शेखोजी आंग्रेंनी राखला होता.

### *पश्चिम तटावरील सुरक्षितता – आज :*

पश्चिम किनारपट्टीवरील सागरी दुर्गांनी मराठाकाळात स्वराज्य रक्षणाची महत्त्वपूर्ण जबाबदारी जशी पार पाडली तशीच महत्त्वपूर्ण जबाबदारी आजही हे सागरीदुर्ग पार पाडताहेत. म्हणूनच आज आपल्या राष्ट्राची समुद्रकिनारपट्टीवरील सुरक्षितता राखली जात आहे. ही सुरक्षितता 26/11 च्या दहशतवादी हल्ल्यापासून अधिकाधिक महत्त्वपूर्ण वाटल्याने भारत सरकारच्या तटरक्षक दलाने याच शिवकालीन सागरी दुर्गांचा उपयोग करून घेतला आहे.
खांदेरी, कार्लाईल, रत्नागिरी, देवगड सारख्या सागरी दुर्गांवर आधुनिक लाईट हाऊसची उभारणी करण्यात आली आहे. सागरांमध्ये मच्छिमारीसाठी दूरवर गेलेल्या मच्छिमारांच्या जहाजांना रात्रीच्यावेळी बरोबर किनाऱ्यावर येता यावे म्हणून वेगवेगळे संकेत दिले जातात. उदा. कार्लाईलच्या दुर्गावरील लाईट हाऊसच्या भव्य लॅम्पचा एक घेरा हा 2.।। मिनिटांचा आहे. अशा वेळा प्रत्येक लाईट हाऊसच्या वेगवेगळ्या आहेत. ह्या जाणिवा मच्छिमारांना असल्याने ते या संकेतानुसार बरोबर हव्या त्या किनाऱ्याला लागतात.

महत्त्वाचे म्हणजे ह्या प्रत्येक लाईट हाऊस जवळच सागरी किनाऱ्यांचा वेध घेवू शकणारी रडार यंत्रणा आज सज्ज करण्यात आली आहे. ही यंत्रणा 24 तास सज्ज असून टॉवरच्या वरील सतत फिरत्या भागावर कॅमेरे बसविण्यात

आले आहेत. दहशतवाद्यांच्या घुसखोरीवर या कॅमेरांमार्फत निगराणी ठेवण्यात आली आहे. पुन्हा 26/11 सारखी परिस्थिती ओढवून येवून देशावर मोठे अतिरेकी संकट येवू नये असा प्रयत्न या सुसज्ज रडार यंत्रणेद्वारे केला आहे. किनारपट्टीच्या सुरक्षिततेकरिता अशा साधारणतः 45 रडार यंत्रणा सागरी किनाऱ्यावर सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.[8]

म्हणजेच स्वराज्याच्या सुरक्षिततेकरिता काल ज्या सागरी दुर्गांचा उपयोग केला गेला त्याच शिवकालीन सागरी दुर्गांचा आजही राष्ट्राच्या सुरक्षिततेकरिता उपयोग केला जात आहे. यात छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीकोन किती विशाल आणि व्यापक होता याची प्रचिती येते.

***संदर्भ :***

1)पवार डॉ. जयसिंगराव, पवार प्रा. मंजुश्री, आधुनिक भारताचा इतिहास, अरूंधती प्रकाशन, कोल्हापूर, 2007, पृ. 43–44.
2)देशपांडे डॉ. प्र. न., मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2001, पृ. 150–151.
3)घाणेकर प्र. के., साद सह्याद्रीची भटकंती किल्ल्यांची, स्नेहल प्रकाशन, पुणे, 2007, पृ. 315.
4)भोसले प्रविण, विजयदुर्ग–कुलाबा–जंजिरा, नरसिंह पब्लिकेशन्स, सांगली, 2010, पृ. 3
5)भोसले प्रविण, शिवलंका सिंधुदुर्ग (दुर्गदर्शनमाला पुस्तक क्र. 6), नरसिंह पब्लिकेशन्स, सांगली, 2010, पृ. 8–9.
6)घाणेकर प्र. के, उपरोक्त, पृ. 77.
7)पिंपळे पराग, साद सागराची (अलिबाग–मुरूड–जंजिरा), बुकमार्क पब्लिकेशन्स, पुणे, 2010, पृ. 9.
8)प्रत्यक्ष सर्व्हेक्षण, दि. 13 मे, 2009.



***अनिल माणिकराव बैसाणे***

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org